वर्ष - 7 । अंक - 142 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™ गणेशोत्सव

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । बुधवार, दिनांक 27 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मुंबई हाकेच्या अंतरावर!

## »एक्सप्रेस वे आठ पदरी करण्याची तयारी : राज्य सरकारकडे प्रस्ताव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवरील वाहनांची वाढती संख्या तसेच भविष्यात होणारी वाढ लक्षात घेऊन महामार्ग आठ पदरी करावा लागणार आहे. त्यासाठी बोरघाटात आणखी दोन बोगदे करण्यात येणार आहेत. हा सुमारे अडीच हजार कोटी रुपयांच्या खर्चाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. हा प्रस्ताव वर्षाअखेर मंजूर होईल, अशी अपेक्षा राज्या रस्ते विकास महामंडळाला आहे.**

एक्सप्रेस-वे करताना गरजेनुसार आणखी दोन बोगदे करावे लागणाची शक्यता आहे. सध्या सी लिंकच्या माध्यमातून उभारण्यात येणारे दोन बोगदे क्षमतेसाठी पुरेसे असले तरी भविष्याचा विचार करता आणखी दोन बोगदे करण्याची चाचपणी रस्ते विकास महामंडळाकडून केली जाणार आहे.

त्यासाठी सुमारे १६० हेक्टर क्षेत्र जमीन लागणार आहे. ही जमीन सध्या वनविभागाच्या ताब्यात असल्याने विविध परवानग्या घेऊन ती लवकर उपलब्ध होईल, अशी शक्यता आहे. मुंबईला जाण्यासाठी एक्स्प्रेस-वे हा वेगवान मार्ग असून, जुन्या महामार्गावरून मुंबईला जाण्यासाठी चार ते पाच तासाचा असलेला प्रवास अवघ्या अडीच ते तीन तासांवर आला आहे.

मात्र, सध्या हा मार्ग सहापदरी आहे. त्यामुळे पुण्याहून मुंबईकडे अथवा मुंबईहून पुण्याकडे ये-जा करताना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे प्रवासाला तीन तासाऐवजी नागरिकांना पाच तास किंवा त्याहून अधिक कालावधी लागत असल्याचे दिसून येते. ही कोंडी फोडण्यासाठी रस्ते विकास महामंडळाने सुरू केलेला 'मिसिंग लिक प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे.



### प्रस्ताव सरकारला पाठविला

» रस्ते विकास महामंडळाने यासाठी सर्वकष प्रकल्प अहवाल (डीपीआर) केला असून, या प्रकल्पासाठी अडीच हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. सध्याच्या महामार्गावर दोन्ही बाजूस प्रत्येकी एक मार्गिका वाढविण्यात येणार आहे. त्याचा प्रस्ताव सरकारला पाठविला आहे. डिसेंबरपूर्वी या प्रस्तावाला मान्यता मिळण्याची अपेक्षा आहे. अशी माहिती रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली.

> “ पुणे-मुंबईदरम्यानच्या प्रवाशांची आणि वाहनांची संख्या वेगाने वाढली आहे. वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी राज्य सरकारने हा महामार्ग आठ पदरी करण्याचा निर्णय घेतला असून, त्यानुसार प्रस्ताव सरकारला पाठविला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळताच सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम सुरू केले जाणार आहे.
>
> **–राहुल वसईकर,**
> **अधीक्षक अभियंता, राज्य रस्ते विकास महामंडळ**

### म्हणून आठ पदरी...

» एक्स्प्रेस-वेची वाहनांची क्षमता साठ हजार असली तरी सद्यस्थितीत या मार्गावरून दरदिवशी ८२ ते ८३ हजार वाहने धावतात. वाहनांची संख्या क्षमतेपेक्षा अधिक असल्याने लेन वाढविण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच येत्या काही वर्षांत नवी मुंबईच्या नव्या विमानतळामुळे वाहनांची संख्या वाढणार आहे. तसेच मिसिंग लिकमुळेही प्रवाशांचा मुंबईला जाणारा वेळ वाचणार असल्याने वाहने आणखी वाढतील. त्यामुळे भविष्यात होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन राज्य सरकारने एक्सप्रेस-वे आता आठ पदरी करण्याचा निर्णय घेतला आहे.

# विसर्जन तयारीसाठी महापालिका ‘अलर्ट’

## »आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचना : प्रमुख घाटांवर सुरक्षा व्यवस्था

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गणेश विसर्जनासाठी महापालिका सज्ज असून शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांवर गणेश मंडळांसाठी तसेच नागरिकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास सुसज्ज रुग्णवाहिका तसेच वैद्यकीय पथके तैनात ठेवण्यात आली आहे. तसेच इतर घाटांवरही जीवरक्षक, अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षा पथक नेमण्यात आले आहेत, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे.**

यंदाच्या गणेशोत्सवाची सांगता पर्यावरणाचे रक्षण करत सुरक्षित व उत्साहाच्या वातावरणात पार पडावी यासाठी महापालिकेच्या वतीने



विविध सेवा सुविधा पुरवण्यात येत आहेत. काळेवाडी मधील स्मशान घाट,निगडी प्राधिकरणातील गणेश तलाव, चिखली स्मशान घाट, पिंपळे गुरव घाट, वाकड गावठाण घाट, मोशी नदी घाट, थेरगाव पूल नदी घाट, वाल्हेकरवाडी मधील जाधव घाट, सुभाषनगर पिंपरी घाट आणि सांगवी येथील वेताळबाबा मंदिर घाट याठिकाणी वैद्यकीय साहित्य, औषधे आणि सुसज्ज रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथके तैनात ठेवण्यात आली आहेत.

### मूर्ती संकलनासाठी व्यवस्था...

» स्वयंसेवी संस्थांमार्फत मूर्ती संकलन केले जात असून महापालिकेच्या वतीने गणेश विसर्जन घाटांवर कृत्रिम विसर्जन हौद उभारण्यात आले आहेत, तसेच निर्माल्य संकलनासाठी निर्माल्य कुंडांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. अग्निशमन विभागाच्या वतीने शहरातील २६ विसर्जन घाटांवर लाईफ जॉकेट, रिंग, गळ, बोट, मेगा फोन, दोरी अशा रेस्क्यू साहित्यासह अग्निशमन पथक तैनात ठेवण्यात आले आहे. क्षेत्रीय कार्यालयांमार्फतही कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून संबधित गणेश विसर्जन घाटांवर आवश्यक ती व्यवस्था करण्यात आली आहे.

# खडकवासला-फुरसुंगी कालव्याऐवजी बोगदा!

## कालव्याच्या जागेवर पर्यायी रस्त्याची चाचपणीस सुरुवात

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**खडकवासला ते फुरसुंगी या दरम्यान कालव्याऐवजी बोगदा प्रस्तावित करण्यात आला असून, कालव्याच्या जागेवर पर्यायी रस्त्याची चाचपणी करण्यास सुरुवात झाली आहे. कालव्याच्या जागेचा वापर रस्ता, उड्डाणपूल किंवा मेट्रो मार्गिका यांपैकी कोणत्या कामासाठी उपयुक्त राहील, याचा अभ्यास करण्याची सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे.**



खडकवासला ते फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे २२०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. हा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनस्तरावर दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी मुंबईत बैठक घेतली. महापालिका आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. त्यावेळी कालव्याच्या जागेचा वापर कशासाठी करता येईल, यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्याबाबतचा अहवाल अभ्यास करून सादर करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी दिली. अहवालानंतर त्याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. धरणातील पाण्याचे बाष्पीभवन, उन्हाळी आवर्तनामुळे आणि गळतीमुळे सुमारे २.८ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी वाया जाते. म्हणजे सुमारे ६ कोटी १७ लाख ३० हजार ७२५ लीटर पाणी वाया जाते. म्हणजेच शहराला दोन महिने पुरेल एवढे हे पाणी आहे. त्यामुळे खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यान बोगद्यातून पाणी नेल्यास या पाण्यात बचत होऊ शकते. या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. जलप्रदूषण रोखण्याबरोबरच आहे, त्या पाणीसाठ्यात बचत करणाऱ्या खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यान प्रस्तावित असलेल्या २८ किलोमीटर लांबीचा बोगद्याच्या (बंद कालवा) अहवालास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून (स्टेट लेव्हल टेक्निकल ॲडव्हायजरी कमिटी – एसएलटीए) राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकल्पातून दोन ते अडीच टीएमसी पाणी वाचणार आहे.

### कालव्याची वहन क्षमता वाढेल

» ७.८० मीटर रूंद, ३.९० मीटर उंच आणि १.९५० मीटर गोलाकार उंची अशा 'डी' आकराच्या बोगद्यातून खडकवासला ते फुरसुंगी दरम्यान बंदिस्त जलवाहिनीतून पाणी नेण्याचे जलसंपदा विभागाकडून निश्चित करण्यात आले आहे. यामुळे कालव्याची क्षमता १५१० क्युसेक होणार असून, ते सर्व पाणी गुरुत्वाकर्षण शक्तीने फुरसुंगीपर्यंत नेण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्याचे प्रदूषण, गळती आणि बाष्पीभवन रोखण्यास मदत होऊन अडीच टीएमसी पाणी वाचणार आहे.

# जेजुरीच्या खंडोबा गडाला प्राप्त होणार ऐतिहासिक वैभव!

## विकास आराखड्यातील कामे दोन वर्षात पुरी करण्याचे नियोजन

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा गडावर शासनाच्या पुरातत्व खात्याकडून गड व मंदिर दुरुस्तीचे काम वेगात सुरू असून मराठेशाहीच्या थोर इतिहासाची साक्ष देणाऱ्या या गडाला पुन्हा ऐतिहासिक वैभव प्राप्त होणार आहे.कामे पूर्ण झाल्यानंतर " देवा तुझी सोन्याची जेजुरी " या उक्तीप्रमाणे खंडोबा गडाला सोन्याची झळाळी येणार आहे.येथे येणाऱ्या भाविक व पर्यटकांना गडाचे प्राचीन वैभव पाहायला मिळणार आहे.**



महाराष्ट्र शासनाने तीर्थक्षेत्र जेजुरी विकास आराखड्यासाठी ३४९ कोटी ४५ लाख रुपये २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात मंजूर केले आहेत.त्यातील पहिल्या टप्प्यातील १०९ कोटी ५७ लाख ९६ हजार खर्चाच्या कामास सुरुवात झाली आहे.जेजुरीचा खंडोबा अठरापगड जातीचे कुलदैवत असून २५० वर्षानंतर प्रथमच शासनाने खंडोबा गडाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून दिल्याने ग्रामस्थ भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. काळाच्या ओघात गडामधे सिमेंट काँक्रीटची बांधकामे झाली,जुन्या दगडी भिंतींना रंग देण्यात आले,संगमरवरी फरशा घालण्यात आल्या, हे सर्व काढून खंडोबा गडाला पुन्हा मूळ स्वरूप दिले जाणार आहे. पावसाचे पाणी मुरल्यामुळे अनेक ठिकाणी दगडांची झीज झाली,अनेक आकर्षक दीपमाळा पडून नष्ट झाल्या, मात्र आता महाराष्ट्र शासनानेच पुरेसा निधी उपलब्ध करून दिल्याने गडाचे योग्य पद्धतीने संवर्धन व सुशोभीकरण होणार आहे. ७ ऑगस्ट रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार यांच्या उपस्थितीत गडावरील विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. पुण्याचे जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली हे सर्व काम होत असून यासाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. पुरातत्व खात्याच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामे होत आहेत.

गडाची दगडी तटबंदी,आतील ओवऱ्या यांची शास्त्रीय पद्धतीने स्वच्छता करून चुन्याने दर्जा भरल्या जात आहेत.पूर्वीच्या काळी दगडी बांधकामाला चुन्यामध्ये विविध पदार्थ मिसळून तो चुना वापरला जायचा तसेच मिश्रण तयार करून गडाचे मजबुतीकरण केले जात आहे.मुख्य मंदिरामधील संगमरवरी फरशा काढून दगडी फरशा बसविल्या जाणार आहेत. संपूर्ण गड व परिसराची शास्त्रीय पद्धतीने डागडुजी होत असल्याने खंडोबा गडाचे आयुष्यमान वाढणार आहे.पहिल्या टप्प्यातील कामासाठी ५० कारागीर दिवस-रात्र काम करीत आहेत.दोन वर्षात जेजुरी विकास आराखड्यातील कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जेजुरीचा खंडोबा हे मराठीशाहीचं कुलदैवत असून छत्रपती शिवराय आणि शहाजीराजे यांची गडावर भेट झाल्याचा उल्लेख आहे. मूळ खंडोबा मंदिर प्राचीन असून गडाच्या परिसरातील तटबंदी दीपमाळा याचे बांधकाम १५११ ते १७८५ मध्ये झालेले आहे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,मल्हारराव होळकर, तुकोजी होळकर, यांनी गडाच्या तटबंदीचे काळ्या पाषाणात बांधकाम केले.

राघो मंबाजी, विठ्ठल शिवदेव यांनी गडामध्ये बांधकामे केली, खंडोबा गडाची उंची पायथ्यापासून ८०२ मीटर असून बांधकाम काळ्या पाषाणातील आहे,गडाच्या परिसरात ३५० दीपमाळा होत्या, त्यातील आता १४२ अस्तित्वात आहेत. पेशवाईच्या काळात सोनोरीचे सरदार रामराव व महिपतराव पानसे यांनी अर्पण केलेला शुद्ध पोलादाचा खंडा (तलवार ) गडावर आहे. पंचधातूच्या खंडोबा माळसादेवीच्या मूर्ती तंजावरचे व्यंकोजी भोसले,नाना फडणीस,सातारचे शाहू महाराज व ग्रामस्थांनी अर्पण केलेले आहेत. विकास आराखड्यानुसार पहिल्या टप्प्यात मुख्य खंडोबा मंदिर व इतर सहाय्यक संरचनासह संपूर्ण तटबंदीचे जतन व दुरुस्तीचे काम होणार आहे. यासाठी ११ कोटी २२ लाख ९६ हजार रुपये तर पायरी मार्गावरील दीपमाळा दुरुस्तीसाठी ११ कोटी ३५ लाख २५ हजार ४३१ रुपये तरतूद करण्यात आली आहे.

### आराखड्यातील कामे पूर्ण करणार

» जेजुरी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे दोन वर्षात पुरी करण्याचे नियोजन आहे. खंडोबा गडाचे योग्य प्रकारे संवर्धन होण्यासाठी कामे सुरू झाली आहेत. खंडोबा गडामध्ये १५ ऑक्टोबर रोजी घटस्थापना होत आहे. तोपर्यंत मुख्य मंदिराच्या गाभाऱ्याचे काम पूर्ण केले जाणार आहे. गडावर देवदर्शनास येणाऱ्या ग्रामस्थ, भाविकांनी सहकार्य करावे.असे आवाहन पुरातत्त्व खात्याचे सहाय्यक संचालक विलास वाहने व खंडोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त पोपट खोमणे यांनी केले आहे.

# सोसायटीधारकांसाठी ‘सारथी’वर स्वतंत्र “ॲक्सिस”!

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

### फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी मानले आभार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाची हेल्पलाईन सारथी पोर्टलमध्ये सोसायटीधारकांसाठी स्वतंत्र ॲक्सिस देण्यात आला आहे. शहरातील सोसायट्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी आणि सोसायटीधारकांच्या तक्रारी मांडण्यासाठी ही सुविधा महापालिकेने दिली आहे. त्यासाठी चिखली-मोशी-चऱ्होली- पिंपरी -चिंचवड- हाउसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने सातत्याने मागण्यांचे गाऱ्हाणे मांडले होते. प्रशासकीय स्तरावर आमदार महेश लांडगे यांनी यासाठी पाठपुरावा केला. अखेर त्याला यश आले आहे.**




शहरातील सोसायटी धारक अनेक प्रश्नाने त्रस्त आहेत. यामध्ये महापालिकेकडून पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही तोपर्यंत सोसायट्यांना विकसकांमार्फत पाणी पुरवठ्याची सोय करावी. हमीपत्र लिहून घेताना पाणीपुरवठा करणार असा उल्लेख केला होता. त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी. मंजूर आराखड्यानुसार इमारतीचे बांधकाम करावे. बदल करताना सभासदांची परवानगी घ्यावी, यासह अनेक समस्या सातत्याने सोसायटी धारक महापालिका प्रशासनाकडे मांडत आहेत. मात्र त्यांच्या या मागण्यांना प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नव्हता.

शहरातील हाऊसिंग सोसायट्यांच्या वाढत्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर सोसायटी फेडरेशनकडून आमदार महेश लांडगे यांना आपल्या मागण्याांबाबत सविस्तर माहिती दिली. आमदार लांडगे यांनी नुकतीच आयुक्त शेखर सिंग यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेत भेट घेऊन त्यांना समस्या निवारणासाठी सारथी प्रणालीमध्ये वेगळी सोय उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार आयुक्त शेखर सिंह यांनी सारथी प्रणालीमध्ये सोसायट्यांना स्वतंत्र ॲक्सेस देऊ केला आहे. त्याद्वारे सोसायटीधारक त्यांना भेडसावणाऱ्या समस्या थेटपणे सारथी प्रणालीमध्ये दाखल करू शकणार आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत त्याचे निराकरण केले जाणार आहे.

### सोसायटीधारकांचे हेलपाटे टळणार...

सोसायटीधारकांना त्यांच्या मागण्यांसाठी सातत्याने अर्ज निवेदने घेऊन पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे जावे लागत होते. त्यामुळे वेळ आणि विनाकारण हेलपाटा होत असे. इतर तक्रारींप्रमाणे सारथीवर सोसायटीच्या समस्यांसाठी स्वतंत्र सुविधा दिल्याने नागरिकांची या त्रासातून सुटका झाली आहे. सारथीवर तक्रारी केल्याने महापालिका प्रशासनापुढे थेट प्रश्न पोचविण्यात येणार आहे. परिणामी आपले प्रश्न मार्गी लागणार असल्याने सोसायटीधारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.



“ सोसायटीधारकांच्या समस्या सोडविण्यासाठी महापालिकेने दखल घेणे गरजेचे आहे. त्यासाठी सारथीवर तक्रारी करण्याची सुविधा देणे गरजेचे असल्याची मागणी फेडरेशनच्या वतीने करण्यात येत होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळत नव्हता. या बाबत आमदार महेश लांडगे यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले. त्यांनी सोसायटी धारकांसोबत बैठक घेतली. महापालिकेकडे पाठपुरावा केला. आयुक्तांना सूचना देत स्वतंत्र एक्सिस देण्याची मागणी केली होती. त्यानुसार ती सुविधा मिळाली आहे.

- **संजीवन सांगळे,** अध्यक्ष,
चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी -चिंचवड- हाउसिंग सोसायटी फेडरेशन.

---

# संसर्गजन्य रुग्णांचे प्रमाण वाढले; उपाययोजना करा!

## दीपक मोढवे-पाटील यांची मागणी : महापालिका अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड संसर्गजन्य आजाराचे वाढते रुग्ण पाहता महापालिका दवाखान्यांत स्वतंत्र यंत्रणा आणि उपाययोजना कराव्यात. नागरी आरोग्याला प्राधान्य द्यावे, अशी मागणी भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेसह राज्यभरात संसर्गजन्य आजाराच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. सर्दी, ताप, खोकला आदींसारख्या त्रासाने रुग्ण त्रस्त आहेत. नुकतेच कोरोना सारख्या महामारीतून जग सावरत आहे. शासनाने योग्य खबरदारी घेतल्यामुळेच या महामारीचा सामना करता आला. त्या पद्धतीची खबरदारी शासनाकडून सध्या अपेक्षीत आहे.

राज्यात कोरोनाच्या आजाराचे वेगवेगळे प्रकार समोर येत आहेत. यासह संसर्गजन्य आजाराचे रुग्ण असलेले प्रमाण देखील वाढत आहे. मध्यंतरी डोळ्यांची साथ आली होती.



शहरातील मासुळकर कॉलनी येथे रुग्ण गर्दी करत आहेत. या आजारांना आळा घालायचे असल्यास वैद्यकीय योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील मोठी रुग्णालये तसेच दवाखान्यात उपचारासाठी रुग्ण मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. रुग्णांची संख्या पाहता शासकीय यंत्रणा देखील तोकड्या पडत आहेत. त्याचा परिणाम रुग्ण सेवेवर होत आहे. ही यंत्रणा वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असेही दीपक मोढवे-पाटील यांनी म्हटले आहे.

### शहरात ठिकठिकाणी कॅम्प राबवा...

पिंपरी-चिंचवड महापालिकेची मोठी आठ रुग्णालये आहेत. या बरोबरच प्रभागात अनेक ठिकाणी दवाखाने देखील आहेत. या रुग्णालये आणि दवाखान्यात अधिकच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच सर्दी, ताप, खोकला आदी सारख्या संसर्गजन्य आजारांच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र आरोग्य कॅम्प राबवावा. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या इतर रुग्णांना त्याचा त्रास होणार नाही. तसेच या आजाराच्या रुग्णांवर योग्य उपचार होऊन त्याचा त्यांना फायदा होईल. याबाबत त्वरित कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणीही दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.

# महिला आरक्षणाचे 27 वर्षांपासून प्रलंबित




**महिला आरक्षणाचे २७ वर्षांपासून प्रलंबित असलेले विधेयक संसदेच्या विशेष अधिवेशनात मंजूर करण्यात आले. भारताच्या इतिहासात हा क्षण सुवर्णक्षण म्हणून नोंदविला जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राज्य कारभारातील निर्धारशक्तीचे आणखी एक फलित महिला आरक्षणाच्या रूपाने देशापुढे आले आहे.**

वर्षांपूर्वी जम्मू-काश्मीरसाठीचे घटनेतील कलम ३७० आणि ३५(अ) रद्द करताना मोदी सरकारच्या निर्धारशक्तीचा प्रत्यय आलाच होता. ३७०वे कलम रद्द झाल्यास रक्ताचे पाट वाहतील, काश्मीरमध्ये तिरंगा फडकू शकणार नाही, अशा इशाऱ्यांना भीक न घालता सर्व कायदेशीर तरतुदींची पूर्तता करत संसदेत ३७०वे कलम रद्द करण्याचा ठराव मंजूर करून घेण्यात आला. राज्यशकट हाकताना कसे कठोर व्हावे, याचा वस्तुपाठ मोदी सरकारने घालून दिला. महिला आरक्षणालाही अनेक पक्षांनी कडवा विरोध दाखवल्यामुळे २०१० मध्ये तत्कालीन मनमोहन सिंग सरकार हतबल होते. परिणामी हे विधेयक संमत होऊ शकले नाही. स्त्री शक्तीच्या अथांग कर्तृत्वाला मानाचा मुजरा करत मोदी सरकारने महिला सक्षमीकरणाचे वचन प्रत्यक्षात आणले आहे. भारतीय जनता पक्षाचा आणि जनसंघाचा इतिहास पाहिल्यास या आरक्षणाची मागणी सातत्याने विविध व्यासपीठांवरून करण्यात आली होती. महिला



सक्षमीकरणाच्या गप्पा मारणाऱ्या अनेक पक्षांनी आपल्या पक्ष संघटनेत आणि सत्तेत महिला शक्तीला किती प्रतिनिधित्व दिले, याचा हिशेब मांडल्यास पुरोगामी म्हणवणाऱ्या पक्षांचा भोंदूपणा उघड होतो. सुषमा स्वराज, निर्मला सीतारामन, स्मृती इराणी यांच्याकडे परराष्ट्र, संरक्षण, अर्थ आणि मनुष्यबळ विकास यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांचा कारभार सोपवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्त्रीशक्तीचा यथोचित सन्मान केला. सुषमा स्वराज यांनी महिला आरक्षणासाठी संसदेच्या व्यासपीठावर आणि बाहेरही सातत्याने आग्रही भूमिका घेतली. त्यामुळेच महिला आरक्षण विधेयक संसदेत मांडले गेल्यावर अनेक सदस्यांनी या विधेयकाचे श्रेय सुषमा स्वराज यांना दिले. सीतारामन यांच्याकडे केंद्रीय अर्थमंत्रीपदाचा कार्यभार सोपवल्यावर अनेक स्वयंघोषित बुद्धिमान, विचारवंत, पत्रकारांनी त्याची टवाळी केली होती. सीतारामन यांनी या खात्याला सर्वार्थाने कसा न्याय दिला, हे आपण पाहिले आहेच. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्त्री शक्तीच्या कर्तृत्वाला कृतीतून मोकळे आकाश दिले. २०१४ मध्ये पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर मोदी सरकारने गेल्या नऊ वर्षांत महिला केंद्रित धोरणाची दिशा स्पष्ट केली आहे. मुलींचा घटत असलेला जन्मदर ही अतिशय चिंतेची बाब आहे. त्यासाठीच मोदी सरकारने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान सुरू केले. स्त्रीभ्रूण हत्येविरोधात परिणामकारक जनजागृती घडविण्यात हे अभियान यशस्वी ठरले आहे. 'पंतप्रधान मातृत्व वंदना' योजनेद्वारे गर्भवतींना पोषक आहार देण्याचे अभियान मोदी सरकारने सुरू केले. गोरगरीब आणि वंचित घटकांतील गर्भवती आणि बालकांना या योजनेद्वारे पोषक आहारासाठी थेट बँक खात्यात अनुदान दिले जाते. यासारख्या योजनांमुळे देशातील माता मृत्युदरात लक्षणीय घट झाली आहे. २०१४-१६ या काळात, प्रति एक लाख मातांमागे १३० इतका असलेला हा मृत्युदर २०१८-२० मध्ये प्रति एक लाखामागे ९७ एवढा कमी झाला. सुकन्या समृद्धी योजनेअंतर्गत टपाल कार्यालय आणि बँकांमध्ये तीन कोटींपेक्षा अधिक खाती उघडण्यात आली. 'उज्ज्वला योजने'अंतर्गत स्वयंपाकासाठीचा गॅस सिलिंडर १० कोटींहून अधिक महिलांना मोफत दिला जात असल्यामुळे कोट्यवधी महिलांची धुराच्या त्रासातून मुक्तता झाली. 'पंतप्रधान मातृवंदना' योजनेचा २.७८ कोटी गर्भवती महिलांना फायदा झाला. 'स्वच्छ भारत' योजनेतून ११ कोटी शौचालये बांधून ग्रामीण भागांतील महिलांचा सन्मान जपला. 'पंतप्रधान सुरक्षित मातृत्व' योजनेद्वारे चार कोटींहून अधिक गर्भवतींची तपासणी करण्यात आली आहे. चार लाख १७ हजार शाळांमध्ये मुलींसाठी शौचालय बांधणे, प्रसूती रजेच्या कालावधीमध्ये दुपटीने वाढ, ४५ लाख मुलींना शिष्यवृत्ती देणे यासारख्या निर्णयांतून मोदी सरकारची स्त्रीशक्ती विषयीची बांधिलकी स्पष्ट झाली आहे. मोदी सरकारने सैनिकी शाळांमध्ये मुलींना प्रवेश देण्याचा निर्णय २०१८-१९ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर अमलात आणला. त्याला मिळालेले यश पाहून सर्व सैनिकी शाळांमध्ये मुलींसाठी १० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात ३२० मुलींना देशभरातील ३३ सैनिकी शाळांमध्ये प्रवेश देण्यात आला.

## संपादकीय »

### बचत बारगळ!

***बचतीची सवय असलेल्या भारतीयांच्या बचतीचा वेग मंदावणे आणि त्याच वेळी कर्जात वाढ होत जाणे हे दोन मुद्दे एकत्रित विचारात घेतल्यास संकटाचा आकार लक्षात यावा..***

संसदेच्या जुन्या भवनातील शेवटचे अधिवेशन, नव्या इमारतीतील पहिले सत्र, महिला आरक्षण विधेयक इत्यादी गत सप्ताहातील दिव्य घटनांत रिझर्व्ह बँकेच्या एका अत्यंत महत्त्वाच्या पाहणीकडे माध्यमांचे आणि त्यामुळे अर्थातच जनसामान्यांचेही दुर्लक्ष झाले. कदाचित असेही असेल की भाषणसंधी देणाऱ्या अनेक तेजःपुंज घटना घडत असल्यामुळे त्यांवर काजळी आणणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या निष्कर्षांकडे दुर्लक्षच झालेले बरे, असेही अनेकांस वाटले असेल. ते तसे असेल वा नसेलही. त्या चर्चेत न अडकता रिझर्व्ह बँकेने प्रसृत केलेल्या आकडेवारीची दखल घेणे आवश्यक ठरते. कारण तीवरून आपल्या जगण्याचे अर्थकारण कसे बदलत चालले आहे याचा बोध होतो. रिझर्व्ह बँकेची ही आकडेवारी भारतीयांच्या बचतीत कशी ऐतिहासिक घट झालेली आहे, याचे धक्कादायक तपशील समोर ठेवते.

**भाजपचे खासदार आणि भारतीय कुस्ती संघटनेचे वादग्रस्त माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांचे ध्वनिचित्रमुद्रण दोन दिवसांत समाजमाध्यमांतून पसरले, त्याने काही जणांचा संताप झाला असला तरी ब्रिजभूषण यांच्यावर कारवाई न करणाऱ्या नेत्यांची सदैव पाठराखण करणाऱ्यांना आपल्या खासदाराच्या आत्मविश्वासाचे, करारीपणाचे, प्रश्नांना सामोरे जाण्याच्या धैर्याचे कौतुकच वाटले असेल.**

## पोलिसांच्या नाड्या कोणाच्या हातात असतात?

मुद्दा हा की, पत्रकारांनी हा प्रश्न विचारलाच कसा. त्याचे कारण दिल्ली पोलिसांनी स्थानिक न्यायालयापुढील सुनावणीत घेतलेल्या भूमिकेत शोधता यावे. 'ब्रिजभूषण यांनी त्यांच्यावरील आरोपांसंबंधात दडवादडवी केली' असे दिल्ली पोलिसांच्या वकिलांनी शनिवारी न्यायालयास सांगितले, त्यामुळे जणू दिल्ली पोलीस आता ब्रिजभूषणबद्दल कठोर भूमिका घेणार अशी 'हवा' पसरली.. मग, दिल्ली पोलिसांच्या नाड्या कोणाच्या हातात असतात हे माहीत असलेल्या पत्रकारांनी ब्रिजभूषण पक्षश्रेष्ठींच्या मनातून उतरल्याचाही निष्कर्ष काढला असेल आणि 'तुम्हाला पुढील निवडणुकीत तिकीटच मिळाले नाही, तर तुम्ही काय करणार?' यासारखा प्रश्न विचारला असेल, तर ते चित्रवाणी पत्रकारितेच्या एकंदर अधीरपणाला साजेसेच म्हणावे लागेल. तरीही, न्यायालयात दिल्ली पोलिसांची भूमिका खरोखर बदलली काय, ही शंका उरतेच आणि ब्रिजभूषण यांच्या कुर्रेबाज उत्तरामुळे या शंकेला बळही



मिळते. पदकविजेत्या महिला कुस्तीपटू ब्रिजभूषण यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप करण्यासाठी पुढे आल्या, २३ एप्रिलपासून धरणे आंदोलनाचा दुसरा टप्पा त्यांनी आरंभला त्यानंतरही हेच दिल्ली पोलीस ब्रिजभूषण यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवून घेण्यासही तयार नव्हते. साधारण २४ ते २६ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान या दिल्ली पोलिसांच्या बाजूने भारताचे महान्यायअभिकर्ता (सॉलिसिटर जनरल) तुषार मेहता हे 'एफआयआर नोंदवण्याआधी काहीएक प्राथमिक छाननी करावी लागेल' म्हणून पोलीस थांबले असल्याचे सरन्यायाधीशांना सांगत होते. 'प्रकरण गंभीर आहे.. एकंदर ४० तक्रारी आहेत, आम्ही कागदपत्रेही पुरवू शकतो' असे कुस्तीगीर महिलांची बाजू मांडणाऱ्या कपिल सिबल यांनी सांगूनही परिणाम होत नव्हता. अखेर सर्वोच्च न्यायालयाने सुनावल्यानंतरच, १५ जून रोजी दिल्ली पोलिसांनी 'एफआयआर' नोंदवून घेतला. यथावकाश दिल्लीमधील सात जिल्हा न्यायालयांपैकी एकात हे प्रकरण सुनावणीसाठी आल्यावर दिल्ली पोलिसांचे वकील जे म्हणाले त्याची बातमी झाली! 'ब्रिजभूषण यांनी संधी मिळेल तेव्हा आणि संधी मिळेल तेथे महिला कुस्तीपटूंशी दुर्वर्तन करण्याचा प्रयत्न केला' आणि 'यासंबंधात दडवादडवी केली' असे हे वकील म्हणाले खरे; पण या प्रकरणांमध्ये एवीतेवी साम्यच असल्यामुळे 'एफआयआर'चे एकत्रीकरण करा, अशी मागणी त्यांनी केली. ती मान्य करणे वा न करणे हा न्यायालयाचा अधिकार आहे. मात्र हा न्यायालयीन लढा केवळ कुणा ब्रिजभूषणला शिक्षा देण्याचा नसून ज्यांच्याशी दुर्वर्तन झाले त्या पदकविजेत्या महिलांच्या सन्मानाचाही आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मोदी सांगतात ते वास्तव नाही!

## » आरक्षण विधेयकाचा उल्लेख करत पवारांचा मोदींवर निशाणा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राजस्थानातील जयपूर येथे महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर थेट हल्ला चढवला होता. काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांना नाईलाजाने महिला आरक्षणाला पाठिंबा द्यावा लागला.**

यापूर्वी देशात कुणीही महिलांना आरक्षण देण्यासंदर्भात विचारही केला नव्हता, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले होते. त्यांच्या याच विधानाला आता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. पवार म्हणाले, "1993 साली माझ्याकडे महाराष्ट्राची सूत्रं होती. देशात1993 मध्ये महाराष्ट्रात राज्य महिला आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. मी मुख्यमंत्री असताना जून 1993 मध्ये महाराष्ट्रात महिला आणि बालविकास हा स्वतंत्र विभाग सुरू केला. देशात असा विभाग कुठेही नव्हता. 24 एप्रिल 1993 रोजी 73वी घटना दुरुस्ती झाली. याची अंमलबजावणी सुरू झाली. त्यात देशभरात पंचायत व्यवस्था लागू झाली. घटनेचे कलम 243 ड हे समाविष्ट केले आणि महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक



तृतियांश आरक्षण देण्याची तरतूद केली. त्याच वर्षी नगर पालिका, पंचायती, महापालिका यात घटनादुरुस्तीचा कायदा पास झाला. आणि शहरी भागात महिलांसाठी आरक्षण लागू झाले. "मला आठवते की, केआर नारायणन हे देशाचे उपराष्ट्रपती होते. त्यांच्या उपस्थित नेहरू सेंटरला या धोरणाचा विषय महिला संघटनेला सांगण्यासाठी एक संमेलन आयोजित केले होते. 22 जून 1994 ला महाराष्ट्राने देशात पहिले महिला धोरण जाहीर केले. या धोरणातूनच महाराष्ट्रात सरकारी, निमसरकारी विभागतील महिलांसाठी तीस टक्के आरक्षण ठेवण्यात आले आणि नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ते 33 टक्के करण्यात आले. असे करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होते. मी मुख्यमंत्री असताना महिलांसंदर्भात असे निर्णय घेतले. मोदी सांगतात या देशात असा विचार कुणी केला नाही. हे वास्तव नाही," असेही पवार म्हणाले. "माझ्याकडे देशाचे संरक्षण खाते होते. तेव्हा तेथे पहिल्यांदा आर्मी, नेव्ही आणि एअर फोर्समध्ये 11 टक्के जागा महिलांसाठी ठेवल्या. हल्ली, प्रजासत्ताकाची परेड दिल्लीतील महत्वाच्या रस्त्यावर होते, त्या परेडचे नेतृत्व एक भगिनी करते. हे आपण बघतो. या देशात एअरफोर्समध्ये महिलांना सहभागी करून घेतले आहे, असेही पवार यांनी यावेळी सांगितले.

### महिला आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र

» "मला आठवते की, केआर नारायणन हे देशाचे उपराष्ट्रपती होते. त्यांच्या उपस्थित नेहरू सेंटरला या धोरणाचा विषय महिला संघटनेला सांगण्यासाठी एक संमेलन आयोजित केले होते. 22 जून 1994 ला महाराष्ट्राने देशात पहिले महिला धोरण जाहीर केले. या धोरणातूनच महाराष्ट्रात सरकारी, निमसरकारी विभागतील महिलांसाठी तीस टक्के आरक्षण ठेवण्यात आले आणि नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ते 33 टक्के करण्यात आले. असे करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होते. मी मुख्यमंत्री असताना महिलांसंदर्भात असे निर्णय घेतले. मोदी सांगतात या देशात असा विचार कुणी केला नाही.

# हा तुमचा पक्षाला इशारा आहे का : पंकजा मुंडे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

गेल्या काही दिवसांपासून सातत्याने भाजपा नेत्या पंकजा मुंडे पक्षात नाराज असल्याची चर्चा होत असते. या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडेंनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरं देताना किंवा जाहीर सभांमधून अशी वक्तव्ये केली ज्यावरून त्या पक्षाला इशारा देत असल्याचीही चर्चा झाली. याबाबत आता पंकजा मुंडेंनाच विचारण्यात आल्यावर त्यांनी हात जोडून याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. त्या मंगळवारी (२६ सप्टेंबर) टीव्ही ९ मराठीला दिलेल्या मुलाखतीत बोलत होत्या. पंकजा मुंडे म्हणाल्या, “पक्ष फार मोठा आहे. माझ्या पक्षाचा नेता हा जगाचा नेता आहे. त्यांना इशारा द्यायची माझी काय औकात आहे. मी त्यांना इशारा देण्याची काहीही गरज नाही. मी कोणतेही इशारे देत नाही. माझी भाषणं समोर बसलेल्या लोकांसाठी असतात. महाराष्ट्राच्या कोणत्या जिल्ह्यात काय बोलायचं हे मला अजूनही माहिती आहे. कुठे काय विषय आहे हे मला माहिती आहे. त्यामुळे मी त्यांच्यासाठी बोलत आहे. “आज माझ्याकडे कोणतंही संवैधानिक कोणतंही पद नाही. असं असताना माझी इतकी लोकप्रियता टिकून असेल, तर ती कशामुळे असेल. ही लोकप्रियता माझा शब्द लोकांना त्यांच्या मनातला वाटतो यामुळे आहे. ते मी सोडू शकत नाही. तो माझा मुख्य पिंड आहे. स्वतःचा पाठिचा कणा आणि पिंड बदलून कुठल्याही क्षेत्रात काम करण्यात काही अर्थ नसतो,” असं सूचक वक्तव्यही पंकजा मुंडेंनी केलं. भाजपात तुम्ही अस्वस्थ आहात का? असं विचारलं असता पंकजा मुंडेंनी पुढे सांगितलं, “मी भाजपात अस्वस्थ नाही. मी सध्या सामान्यपणेच अस्वस्थ आहे. कारण माझ्या परिस्थितीत इतर कुणालाही ठेवलं तर तो माणूस अस्वस्थ होईलच किंवा तो आणखी काय करेल? हे माहीत नाही. पण मी कणखरपणे उभी आहे. मी अस्वस्थ असताना कोणताही निर्णय घेत नाही. मी फार जड आत्मा आहे. मी पटकन डगमगणारी नाही. मी अस्वस्थ आहे, कारण एकाचवेळी मी खूप गोष्टींकडे लक्ष देत आहे. अगदी घरापासून व्यावसायिक गोष्टी, राजकारणाकडे लक्ष देत आहे. मी ‘वन मॅन आर्मी’ आहे, म्हणून मी अस्वस्थ आहे.

# मुख्यमंत्री शिंदे अपात्र होऊ शकत नाहीत

## » हिवाळी अधिवेशनामुळे डिसेंबरमध्ये सुनावणी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आमदार अपात्रतेबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असले तरी सुनावणीला विलंब लागण्याची शक्यता कायदेतज्ज्ञांमधून व्यक्त केली जात आहे. शिंदे गटाने स्वतंत्र सुनावणीची मागणी केली आहे. तसे झाल्यास प्रत्येक याचिकेवर आमदारांची सुनावणी होईल आणि अपात्रतेचा निकाल अगदी जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत पुढे जाण्याची शक्यता आहे. यातच आता भाजपच्या ज्येष्ठ नेत्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अपात्र होऊ शकत नाही, असा दावा केला आहे.**



### शिंदे यांच्याबरोबर 40 आमदार

» संख्येच्या आधारावर विचार केला तर एकनाथ शिंदे यांच्याबरोबर ४० आमदार गेले आहेत. संख्या मोठी असल्याने ते अपात्र होऊ शकत नाहीत. आमदार अपात्र होण्यासाठी विधानसभेत व्हिप काढावा लागतो. प्रतोदने व्हिप काढला आणि त्या व्हिपचे उल्लंघन केले तर पक्षाच्या आदेशाचे उल्लंघन केले म्हणून संबंधित आमदार अपात्र होऊ शकतात, असे सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आमदारांचा नैसर्गिक अधिकार डावलू शकत नसल्याचे मत स्पष्ट केले आहे. आता पुढील सुनावणी १३ ऑक्टोबर रोजी आहे. या सुनावणीत केवळ एकत्र सुनावणी घ्यायची की नाही, हेच निश्चित होईल. हिवाळी अधिवेशनामुळे डिसेंबरमध्ये सुनावणी होणे शक्य नाही. त्यामुळे जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यानंतरच सुनावणी सुरू होऊन निकाल लागण्यास मार्च उजाडेल आणि त्यावेळी लोकसभा निवडणुकांची धांदल सुरू झालेली असेल, याकडे तज्ज्ञ लक्ष वेधत आहेत. यानंतर आता भाजप नेते आणि मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकनाथ शिंदे अपात्र ठरणार नाहीत, असा दावा केला आहे. आपल्याला माहिती आहे की, एकनाथ शिंदे दुसऱ्या पक्षात गेले नाहीत. त्यामुळे ते अपात्र होऊ शकत नाहीत.

भाजपने मुख्यमंत्री म्हणून त्यांना पाठिंबा दिला आहे. संख्येच्या आधारावर विचार केला तर एकनाथ शिंदे यांच्याबरोबर ४० आमदार गेले आहेत. संख्या मोठी असल्याने ते अपात्र होऊ शकत नाहीत. आमदार अपात्र होण्यासाठी विधानसभेत व्हिप काढावा लागतो. प्रतोदने व्हिप काढला आणि त्या व्हिपचे उल्लंघन केले तर पक्षाच्या आदेशाचे उल्लंघन केले म्हणून संबंधित आमदार अपात्र होऊ शकतात, असे सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

दरम्यान, आपल्याकडे कोणत्या पक्षाची जबाबदारी कुणाकडे असावी? पक्षाचा प्रमुख कोण? त्या पक्षाचे चिन्ह कुणाकडे असावे? याचा निर्णय संविधानानुसार निवडणूक आयोग घेत असतो. त्याप्रमाणे एकनाथ शिंदे यांना पक्षाचे नाव आणि पक्षचिन्ह मिळाले आहे. पक्ष प्रमुखाची जबाबदारी त्यांच्याकडे आली आहे. त्यामुळे व्यक्तिगत कुणी विचारले तर शिंदे गटाकडून कोणत्याही नियमांचे उल्लंघन झाले नाही, ज्यामुळे तुम्ही त्यांना अपात्र करू शकाल, हे वैयक्तिक मत आहे, असे सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

# काँग्रेस नक्षलवाद्यांद्वारे चालवली जाते!

## » काँग्रेस पक्ष हा गंज आलेल्या लोखंडासारखा : पंतप्रधान मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**"काँग्रेस पक्ष हा गंज आलेल्या लोखंडासारखा असून त्याचा ताबा आता 'शहरी नक्षलवाद्यां'कडे आहे", असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी मध्य प्रदेशातील भोपाळ येथील जाहीर सभेत केला. "काँग्रेस पक्ष भाडेतत्त्वावर चालविण्यास दिला गेला असून त्याचे 'कंत्राट' शहरी नक्षलवाद्यांना मिळाले आहे. आता शहरी नक्षलवाद्यांकडून काँग्रेसची धोरणे आणि घोषणा तयार केल्या जातात, नेत्यांकडून नव्हे. शहरी नक्षल्यांकडे पक्षाचा ताबा गेल्यामुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता जाणवत आहे.**

त्यामुळेच काँग्रेसची सगळीकडे पडझड होत आहे, असा आरोपही मोदी यांनी भोपाळच्या सभेत बोलत असताना केला. जुलै आणि ऑगस्ट २०१८ मध्ये पुण्यातील एल्गार परिषदेच्या निमित्ताने देशभरातून अनेक कार्यकर्त्यांची अटक झाल्यानंतर 'शहरी नक्षलवादी' हा शब्द अधिक प्रचलित झाला. तेव्हापासून भाजपाने अनेकदा हा शब्द वापरला आहे. पुण्यातील एल्गार परिषदेनंतर (३१ डिसेंबर २०१७) भीमा कोरेगाव येथे हिंसाचार उसळला होता. या प्रकरणाशी संबंधित असलेल्या कार्यकर्त्यांचे अटकसत्र राबविण्यात आले होते, पोलिसांनी या लोकांना शहरी नक्षलवादी असा शब्द वापरला होता. या वादात मध्यंतरी चित्रपट निर्माते विवेक अग्निहोत्री यांनीही उडी घेतली होती. जे लोक शहरी नक्षलवाद्यांचे समर्थन करतात त्यांची यादी तयारी करावी, असे आवाहन अग्निहोत्री यांनी ट्विटरवरून केले होते.



नोव्हेंबर २०१८ मध्ये केंद्रीय गृह मंत्रालयाने एक निवेदन काढले होते. ज्यात म्हटले, "पुढील सहा महिन्यात डाव्या विचारसरणीच्या कट्टरतावादाविरोधात प्रभावी आणि निर्णायक मोहीम राबवावी, असे निर्देश गृहमंत्री देत आहेत. शहरी नक्षलवादी आणि त्यांचे सूत्रधार यांच्यावर कारवाई केली जावी." त्याच महिन्यात भाजपाचे खासदार मनोज तिवारी यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना 'शहरी नक्षलवादी' म्हटले. पत्रकार परिषदेत तिवारी म्हणाले, "काही शहरी नक्षलवादी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मारण्याचा कट रचत आहेत. अरविंद केजरीवाल हे शहरी नक्षलवादाचे सर्वात मोठे उदाहरण आहे." सुप्रसिद्ध कन्नड लेखक आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते गिरीश कर्नाड यांनी पत्रकार गौरी लंकेश यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या निषेध आंदोलनात "मीदेखील शहरी नक्षलवादी" (ME TOO URBAN NAXAL) असे फलक झळकावले. त्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

### शहरी नक्षलवाद सरकारचा शब्द नाही

» ऑक्टोबर २०२२ रोजी, गुजरातमधील भरूच जिल्ह्यातील बल्क ड्रग पार्कचे भूमिपूजन करत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा शहरी नक्षलवादाचा विषय उपस्थित करून विरोधकांवर टीका केली होती. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाचा उल्लेख न करता मोदींनी ही टीका केल्याचे बोलले गेले. या निवडणुकीत आम आदमी पक्षाने आपले उमेदवार उभे केले होते. मोदी म्हणाले, "शहरी नक्षलवादी नव्या वेशात गुजरातमध्ये शिरत आहेत. त्यांनी त्यांचा वेश बदलला आहे. ते आमच्या भोळ्याभाबड्या युवकांची दिशाभूल करत आहेत. हे लोक परकीय शक्तीचे हस्तक म्हणून काम करत आहेत.

ऑक्टोबर २०१८ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी मेळाव्यात बोलत असताना सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले, "शहरी माओवाद समाजात खोटा प्रचार करून द्वेष पसरवत होता. हे लोक (माओवादी) राष्ट्राच्या शत्रूकडून मदत घेतात आणि ते कुठेही गेले तरी राष्ट्राची बदनामी करत असतात. आपल्या अंध अनुयायांच्या पाठिंब्यावर राष्ट्रविरोधी नेतृत्व प्रस्थापित करणे हा शहरी नक्षलवाद्यांचा नवा डावा सिद्धांत आहे. तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार शांता छेत्री यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नाला उत्तर देत असताना गृह राज्यमंत्री जी. किशन रेड्डी यांनी मार्च २०२० मध्ये संसदेत सांगितले की, शहरी नक्षलवाद हा शब्द गृहखात्याने किंवा भारत सरकारने वापरलेला नाही.

# जनगणनेपासून आजवर काय झाले?

## » राहुल गांधींकडून जातनिहाय जनगणनेची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जातनिहाय जनगणना केली जावी, हा मुद्दा काँग्रेसने देशभर पेटवत ठेवण्याचा निर्धार केला असताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी युपीए-२ च्या "काळात सामाजिक आर्थिक जातनिहाय जनगणना" झाली असल्याची आठवण करून दिली. मात्र, या जनगणनेतील सदर आकडेवारी मोदी सरकारने दडपली असल्याचा आरोप गांधी यांनी केला.**

सोमवारी छत्तीसगडच्या बिलासपूर येथे जाहीर सभेत बोलत असताना राहुल गांधी म्हणाले, "काँग्रेसच्या काळात २०११ साली जातनिहाय जनगणना झाली होती. या जनगणनेमध्ये प्रत्येक जातीचा डेटा गोळा केलेला आहे. मात्र, मोदी सरकार हा डेटा जनतेला दाखविण्यास तयार नाही. या विषयावर आधीही भाष्य केले आहे. केंद्र सरकारमध्ये असलेल्या ९० सचिवांपैकी फक्त तीन सचिव ओबीसी प्रवर्गातील आहेत. जातनिहाय जनगणना हा भारताचा एक्स-रे आहे. या जनगणनेमधून अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी आणि जातीची लोकसंख्या किती आहे? याचा तपशील आपल्याला मिळू शकतो." भाजपाचा हिंदुत्त्वाच्या अजेंड्याला प्रत्युत्तर देण्यासाठी सामाजिक न्याय आणि ओबीसींचे एकत्रीकरण म्हणजेच मंडल २.० विषय इंडिया आघाडीकडून पुढे केला जाऊ शकतो. जातनिहाय जनगणनेची मागणी पहिल्यांदा झाल्यापासून आजवर काय काय झाले? यावर टाकलेली एक नजर : युपीए सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळाचा एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर समाजवादी पार्टी (SP), राष्ट्रीय जनता दल (RJD) आणि जनता दल (युनायटेड) यांनी २०११ मध्ये होणाऱ्या दशकीय जनगणनेसह जातनिहाय गणनाही करावी, अशी मागणी पहिल्यांदा केली. त्यावेळी काँग्रेसला या मागणीमुळे आश्चर्याचा धक्का बसला होता. सत्ताधारी काँग्रेस आणि प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपाने जातनिहाय जनगणनेबाबत स्पष्ट भूमिका घेतली नाही. तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम यांच्या गृहखात्याने दावा केला की, जनगणनेच्या वेळी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांमध्ये जातीच्या रकान्याचाही समावेश केल्यास इतर समस्या उद्भवू शकतात, ज्याचे परिणाम चुकीचे होतील. मात्र, उत्तरेतील हिंदी भाषिक पट्ट्यात असलेल्या समाजवादी विचारधारेच्या पक्षांचा मतदार वर्ग हा मोठ्या प्रमाणात ओबीसी वर्ग असल्यामुळे त्यांनी ही जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली आणि त्यावेळी (२०१०) सादर झालेल्या महिला आरक्षण विधेयकाच्या विरोधात भूमिका घेतली.



### त्यावर्षी जातनिहाय जनगणना नाही ?

» सप्टेंबर महिन्यात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून त्यावर्षी जातनिहाय जनगणना राबविणार नसल्याचे सांगितले. अनुसूचित जाती आणि जमाती या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर जातीसंबंधी माहिती गोळा न करण्याचा निर्णय धोरणात्मक पातळीवर घेण्यात आला आहे, असे सरकारने स्पष्ट केले.

# कावेरी नदी पाणी वाटप प्रश्न पेटला!


। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

गेल्या अनेक वर्षांपासून कावेरी नदीच्या पाणीवाटपाचा प्रश्न प्रलंबित आहे. अनेकदा या मुद्द्यावरून तामिळनाडू व कर्नाटक या दोन्ही राज्यांमधील सामान्य जनतेपासून शेतकरी-कष्टकऱ्यांनी आंदोलनं केली आहेत. ही आंदोलनं अनेकदा आक्रमक, कधी हिंसकही झाल्याचं पाहायला मिळालं आहे. मात्र, अद्याप या दोन राज्यांमधला कावेरी नदीच्या पाणीवाटपाचा प्रश्न सुटलेला नाही. सध्या याच मुद्द्यावरून पुन्हा एकदा दोन्ही राज्यांमधील जनता आक्रमक झाली आहे. तामिळनाडूसाठी कावेरी नदीचं पाणी सोडण्यास कर्नाटकचा तीव्र विरोध आहे. यासंदर्भात प्रशासकीय स्तरावर बोलणी चालू असताना त्याचा निषेध म्हणून कर्नाटकमध्ये ठिकठिकाणी आंदोलनं होताना दिसत आहेत. कर्नाटकमधल्या आंदोलक शेतकरी संघटनांची शिखर संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कर्नाटक जल संरक्षण समितीनं मंगळवारी तामिळनाडूला पाणी सोडण्याला विरोध करण्यासाठी बंगळुरू बंद पुकारला. भाजपा व आम आदमी पक्षानंही या बंदला पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे बंगळुरूमधील व कर्नाटक स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन अर्थात केएसआरटीसीच्या प्रवासी वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. एकीकडे कर्नाटकमध्ये कावेरी नदीचं पाणी सोडण्यास विरोध केला जात असताना दुसरीकडे तामिळनाडूसाठी पाणी न सोडण्याच्या कृतीचा निषेध करण्यासाठी व पाणी सोडण्याची मागणी करण्यासाठी तामिळनाडूमध्ये आंदोलनं होत आहेत. तामिळनाडूच्या तिरुचिरापल्लीमध्ये तर काही शेतकऱ्यांनी चक्क मेलेले उंदीर तोंडात पकडून कर्नाटक सरकारचा निषेध करण्यासाठी आंदोलन सुरू केलं आहे. तामिळनाडूतील शेती व्यवसायासाठी कावेरी नदीचं पाणी अत्यंत महत्त्वाचं असून ते तातडीने सोडण्याची मागणी या शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# देशभरातील 10 प्रसिद्ध गणपती!

**'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया' असा गणरायाचा जयघोष संपूर्ण भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, गणेशोत्सवाच्या संपूर्ण १० दिवस आणि रात्री ऐकायला मिळतो. संपूर्ण भारतात गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जात असताना, महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेश मंडळांचा उत्साह पाहण्यासारखा असतो. आज आम्ही भारतभरातील १० प्रसिद्ध गणपती मंडळांची माहिती देणार आहोत. खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...**



## लालबागचा राजा- लालबाग मुंबई

1 ब्रिटिश राजवटीत पहिल्यांदा 'लालबागचा राजा'ची स्थापना झाल्यापासून ८५ वर्षांहून अधिक काळ तो मुंबईत 'राज्य' करीत आहे. 'लालबागच्या राजा'ची स्थापना इ.स. १९३४ साली करण्यात आली होती. कोळी समाजाच्या नवसाला पावलेला म्हणून हा गणपती सर्वप्रथम प्रसिद्ध झाला. मुंबईतील लालबागमध्ये जुन्या काळात मुख्यत्वे विणकर आणि इतर कामगार राहत होते. हे मंडळ मुंबईतील सर्वांत सुशोभित असलेल्या मंडळांपैकी एक आहे आणि उत्सवाच्या १० दिवसांमध्ये दररोज सरासरी १५ लाख लोक येथे दर्शनासाठी येतात. लोककथा अशी आहे की, लालबागचा राजा आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करतो.

## दगडूशेठ हलवाई गणपती- पुणे

2 दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ हे भारतातील सर्वांत जुन्या सार्वजनिक मंडळांपैकी एक आहे. कारण- १८९६ पासून येथे उत्सव साजरा केला जात आहे. दगडूशेठ हलवाई हे कर्नाटकातील मिठाई व्यापारी होते; जे पुण्यात स्थायिक झाले होते. या ठिकाणी बसवलेली गणेशमूर्ती देशातील सर्वात महागडी म्हणून ओळखली जाते. या मूर्तीचा सुमारे एक कोटी रुपयांचा विमा उतरवण्यात आल्याचे वृत्त आहे.

## मुंबईचा राजा- गणेश गल्ली,

3 गणेश सार्वजनिक उत्सवाच्या १० दिवसांत मुंबईतील सर्व रस्ते लालबाग येथील गणेश गल्लीकडे जातात. प्रत्येक वेळी सामाजिक संदेश देणाऱ्या शास्त्रीय मूर्तीसाठी हे मंडळ प्रसिद्ध आहे. मुंबईतील सर्वात जुने मंडळ, असा या मंडळाचा मान आहे. १९२८ मध्ये लालबागमधील गिरणी कामगारांनी गणेश गल्ली मंडळाची स्थापना केली.

## खैरताबाद गणेश- हैदराबाद

4 हैदराबाद हे सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदाने साजरे करणारे आणखी एक शहर आहे. खैरताबाद गणेश मंडळ हे परंपरेने हैदराबादमधील सर्वांत मोठे गणेश मंडळ आहे. या वर्षी ही मूर्ती जवळपास १०० फूट उंच असून, त्याची किंमत एक कोटी रुपयांपर्यंत आहे. ही मूर्ती राजस्थानातून आणलेल्या मातीपासून बनवून, सेंद्रिय रंगाने रंगवली जाते.

## कसबा गणपती- पुणे

5 कसबा गणपतीला शिवाजी महाराजांच्या काळापासूनचा इतिहास आहे. शिवरायांची आई जिजामाता यांनी हे मंदिर बांधले. हे गणेशाचे मंदिर असले तरी ते दरवर्षी सार्वजनिक मंडळाद्वारे गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जातो. लोकमान्य टिळकांनी पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात कसबा गणपती येथे केली. या मूर्तीला अनेक वर्षांपासून भारतातील सर्वोत्तम मूर्तींपैकी एक म्हणून स्थान देण्यात आले आहे.

## जीएसबी सेवा मंडळ गणपती– किंग्ज सर्कल, मुंबई

6 जीएसबी गणपती ही सलग अनेक वर्षांपासून भारतातील सर्वांत श्रीमंत गणेशमूर्ती आहे. दक्षिण भारतीय आणि गुजराती लोकांची वस्ती असलेल्या मुंबईतील किंग्ज सर्कल या ठिकाणी ही मूर्ती प्रतिष्ठापित केली आहे. या मंडळामध्ये दरवर्षी ६५ हजारहून अधिक लोक त्याची पूजा करतात. या सार्वजनिक गणेशमूर्तीची उत्कंठावर्धक बाब म्हणजे १० ऐवजी पाच दिवस पूजाअर्चा केली करून, उत्सवाच्या पाचव्या दिवशी विसर्जन केले जाते.

## गिरगावचा राजा– गिरगाव, मुंबई

7 खेतवाडी व गिरगाव ही गुजराती व मारवाडी लोकसंख्या असलेली व्यापारी क्षेत्रे आहेत. पण, हे समुदाय दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मूळ महाराष्ट्रीयन लोकांसोबत एकत्र येतात. हे मंडळ विशिष्ट थीमसह उभारले जाते. मूर्तीची रचना सौंदर्यपूर्ण असते. या गणेशोत्सव मंडळाला 'गिरगावचा राजा' होण्याचा मान हक्काने दिला जातो.

## धरमपेठ गणेशोत्सव- नागपूर

8 नागपूरमध्ये जवळपास ६० वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. पुणे-मुंबईसारखी मंडप व्यवस्था आणि मूर्ती तितकी मोठी नसली तरी धरमपेठ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ हे नागपूरमधील सर्वात मोठे मंडळ आहे. भाविकांची येथे नेहमी गर्दी असते.

## नाशिकचा राजा- नाशिक

9 महाराष्ट्रातील नाशिक हे आणखी एक औद्योगिक शहर आहे. येथे अनेक वर्षांपासून गणेशोत्सव साजरा केला जातो. जरी मंडप आणि उत्सव पुण्याइतका भव्य नसला तरी नाशिकचा राजा हे नाशिकमधील सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ म्हणून ओळखले जाते. घणकर लेन, अशोकस्तंभ, नाशिक येथे या मंडळाचा उत्सव साजरा होतो. उत्सवाच्या दहाव्या दिवशी विसर्जन करण्यापूर्वी १० दिवस मूर्तीची पूजा केली जाते.

## पणजीम, गोवा-गणेशोत्सव

10 गोवा हे अनेक अर्थांनी महाराष्ट्रासारखेच आहे. गोव्यात मराठी लोकसंख्या लक्षणीय आहे. तर, गणेश चतुर्थी हा गोव्यातील लोकप्रिय सण आहे. महाराष्ट्रात हे मंडळ तितके मोठे नसले तरी गोव्यात या गणेश मंडळाचा वाटा आहे. पणजीम येथील सार्वजनिक गणेशोत्सव हे एक असे उदाहरण आहे की, जिथे गणेशमूर्ती लोकांसाठी खुल्या आहेत; ज्यामध्ये १० दिवस दररोज पूजा आणि आरती केली जाते. मडगाव व म्हापसा येथेही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत.

गणेशोत्सव हा भारतातील सर्वांत मोठ्या उत्सवांपैकी एक आहे. ज्या भागात गणेशाचे मंडप आहेत, त्या भागात वाहतूक जवळपास ठप्प होते. या मंडळाच्या परिसरात १० दिवस भाविकांची प्रचंड गर्दी असते. हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यामागची प्राथमिक संकल्पना ही विविध धर्म आणि जातींतल्या लोकांमधील संबंध वाढवणे आणि एकता निर्माण करणे, अशी होती. लोकांनी आपापसांतील मतभेद दूर करून गणेश चतुर्थी एकत्रितपणे साजरी करण्याची वेळ आली आहे.

गणेश चतुर्थी फक्त महाराष्ट्रातच साजरी केली जाते, असे अनेकांना वाटते; पण ते चुकीचे आहे. कारण- हा संपूर्ण भारताचा सण आहे. म्हणून भारताच्या अनेक भागांमध्ये गणेश चतुर्थी साजरी केली जाते; तर तमिळनाडू आणि इतर दक्षिणेकडील राज्यांमध्ये याच दिवसाला 'विनयगर चतुर्थी' म्हणून ओळखले जाते. हा सण भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीला येतो. हा उत्सव १० दिवस चालतो आणि अनंत चतुर्दशी (शुक्ल पक्षाच्या १४ व्या दिवशी) गणेशमूर्तीच्या विसर्जनाने समाप्त होतो. बहुतेक लोक घरी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून सण साजरा करतात; तर महाराष्ट्रात मंडळामध्ये महाकाय गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून, सार्वजनिक रीत्या हा उत्सव साजरा केला जातो. त्यामुळे याला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणून ओळखले जाते.

# हॉकीत भारतीय संघाचा दबदबा!

## एक-दोन नव्हे पुन्हा 16 गोल करत सिंगापूरचा उडवला धुव्वा

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय हॉकी संघाने गट टप्प्यातील सलग दुसऱ्या सामन्यात सिंगापूरचा १६-१ असा दारूण पराभव केला. भारताने या सामन्यात सुरुवातीपासूनच आघाडी कायम ठेवली होती. पहिल्या क्वार्टरमध्ये भारताची सुरुवात चांगली झाली त्यांनी एक गोल केला. यानंतरही संघाचा गोल करण्याचा क्रम थांबला नाही आणि भारताने एकापाठोपाठ एक गोल करत शानदार विजय मिळवला. कर्णधार हरमनप्रीत सिंगने सर्वाधिक ४ गोल केले दुसरीकडे, मनदीप सिंगने गोलची हॅट्रिक केली.**



आशियाई क्रीडा स्पर्धेत याआधी भारतीय हॉकी संघाने ग्रुप स्टेजच्या पहिल्या सामन्यात उझबेकिस्तानचा १६-० असा पराभव केला होता. आज हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने सिंगापूरचा १६-१ असा पराभव केला. मनदीप सिंगने १३व्या मिनिटाला भारतासाठी पहिला गोल केला. पहिल्या क्वार्टरअखेर भारताने १-० अशी आघाडी मिळवली होती. त्यानंतर दुसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीला १६व्या मिनिटाला ललित कुमारने भारतासाठी दुसरा गोल केला. टीम इंडियाने सिंगापूरला सामन्यात परत येण्याची संधीच दिली नाही. यानंतर २२व्या मिनिटाला गुजरांतने संघासाठी तिसरा गोल केला तर २३व्या मिनिटाला विवेक सागर प्रसादने संघासाठी चौथा गोल करत भारताची आघाडी आणखी वाढवली.

गोल करण्याची संधी कर्णधार हरमनप्रीत सिंगने देखील सोडली नाही. त्याने शानदार हॉकी खेळत संघाच्या खात्यात पाचवा गोल केला. मनदीप सिंगने २९व्या मिनिटाला आपला दुसरा आणि संघाचा सहावा गोल केला. अशा प्रकारे भारताने पूर्वार्धात ६-० अशी आघाडी मिळवली. दुसऱ्या हाफला सुरुवात झाल्यानंतर थोड्याच वेळात म्हणजेच ३७व्या मिनिटाला मनदीप सिंगने संघासाठी ७वा आणि ३८व्या मिनिटाला समशेर सिंगने ८वा गोल केला. त्यानंतर ४०व्या मिनिटाला कर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरद्वारे दोन गोल केले. अशाप्रकारे दुसऱ्या हाफला सुरुवात झाल्यानंतर काही वेळातच भारताने १०-० अशी भक्कम आघाडी मिळवली.

४२व्या मिनिटाला कर्णधार हरमनप्रीत सिंगने आणखी एक पेनल्टी कॉर्नर घेत संघासाठी ११वा गोल केला. अशा प्रकारे, तिसऱ्या क्वार्टरच्या अखेरीस भारताने ११-० अशी कमांडिंग आघाडी मिळवली. चौथा क्वार्टर सुरु होताच मनदीप सिंगने ५०व्या मिनिटाला दोन गोल केले. अभिषेकनेही वाहत्या गंगेत हात धूत मिळालेल्या संधीचा फायदा घेत ५१व्या आणि ५२व्या मिनिटाला दोन गोल केले. यानंतर ५३व्या मिनिटाला सिंगापूरच्या झकी जुल्करनैनने संघासाठी पहिला आणि शेवटचा गोल केला. अवघ्या २ मिनिटांनंतर, भारताच्या वरुण कुमारने ५५व्या मिनिटाला सलग दोन गोल करत भारताला १६-१ ने आघाडीवर नेले. अशा प्रकारे भारताने सिंगापूरविरुद्ध दणदणीत विजय नोंदवला. या विजयाने भारतीय संघ ग्रुपमध्ये पहिल्या क्रमांकावर पोहचला आहे.

### प्रसादने गोल करत आघाडी वाढवली


टीम इंडियाने सिंगापूरला सामन्यात परत येण्याची संधीच दिली नाही. यानंतर २२व्या मिनिटाला गुजरांतने संघासाठी तिसरा गोल केला तर २३व्या मिनिटाला विवेक सागर प्रसादने संघासाठी चौथा गोल करत भारताची आघाडी आणखी वाढवली. गोल करण्याची संधी कर्णधार हरमनप्रीत सिंगने देखील सोडली नाही. त्याने शानदार हॉकी खेळत संघाच्या खात्यात पाचवा गोल केला. मनदीप सिंगने २९व्या मिनिटाला आपला दुसरा आणि संघाचा सहावा गोल केला. अशा प्रकारे भारताने पूर्वार्धात ६-० अशी आघाडी मिळवली.

# नियमित आहार उपयोगाचा नसतो!

## रमिताने सांगितले तिच्या यशामागील गुपित

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**चविष्ट पूरक आहार, प्राणायाम आणि योगासने हे कोणत्याही किशोरवयीन व्यक्तीला रोज करायला आवडेल असे नाही, परंतु येथील आशियाई क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या नेमबाज रमिता जिंदालचा हा दिनक्रम होता. रमिता ही भारतीय महिला नेमबाज संघाची सदस्य आहे जिने महिलांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये रौप्यपदक जिंकले आणि वैयक्तिक स्पर्धेत कांस्यपदकही जिंकले. मिश्र दुहेरीत कांस्यपदक जिंकण्यापासून ती आणि दिव्यांश पनवार कमी फरकाने हुकले.**



### लक्ष ऑलिम्पिक संघात स्थान मिळवणे

ऑलिम्पिकमध्ये एकाही भारतीय महिलेने पदक जिंकले नाही आणि पुढील वर्षी पॅरिसमध्ये ही कमतरता भरून काढण्याचे माझे ध्येय आहे.” ती पुढे म्हणाली, “अभिनव सर हे प्रत्येक नेमबाजाचे प्रेरणास्थान आहेत. तिच्याप्रमाणे मलाही ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकायचे आहे, जे आतापर्यंत कोणत्याही भारतीय महिला नेमबाजाने जिंकलेले नाही. मी नुकतेच वरिष्ठ संघाबरोबर खेळायला सुरुवात केली आहे. आता माझे लक्ष हे पॅरिस ऑलिम्पिक संघात स्थान मिळवणे हे आहे.

हरियाणाच्या कुरुक्षेत्र जिल्ह्यातील लाडवा शहरातील रहिवासी असलेल्या रमिता म्हणाली, “मी मानसशास्त्रज्ञ गायत्री वर्तक यांच्याशी सल्लामसलत केली, त्यांनी मला हे सर्व तंदुरुस्तीबाबतचे तंत्र सांगितले. मी सकाळी प्राणायाम आणि योगासने करते. हे मन आणि मेंदू शांत राहण्यास मदत करते. शरीरासाठी खुराक देखील महत्वाचा आहे आणि तो कुठल्या प्रकारचा असावा यासाठी माझ्याकडे तज्ञ देखील आहेत. त्यांनी मला पूरक आहार कोणता आहे, हे सांगितले. मी शाकाहारी असल्याने, मी सर्व पूरक आहार घेते ज्याची चव खूप वाईट आहे. पण आपण काय करू शकतो? मला तासनतास उभे शुटिंगसाठी पोडीयमवर उभे राहावे लागते. रमिताचे वडील अरविंद तिला २०१७ मध्ये शूटिंग रेंजवर घेऊन गेले आणि जेव्हा तिने पहिल्यांदा हा खेळला तेव्हा तिला खूप आवडला. त्यावेळी ती १३ वर्षांची होती आणि आठवीत शिकत होती. ती म्हणाली, “मी करण शूटिंग अकादमीमध्ये प्रवेश घेतला आणि खेळाला करिअर करण्याचा विचार केला. त्यावेळी मला तेथील सर सांगत होते की, नियमित आहार उपयोगाचा नसतो नुसता तर सराव देखील खूप गरजेचा आहे. यामुळे मी दोन्ही गोष्टी कशा संतुलित राहतील यावर लक्ष केंद्रित केले. वकील असण्याबरोबरच, रमिताचे वडील कुरुक्षेत्रात आयकर सल्लागार देखील आहेत, त्यामुळे त्यांना कधीही आर्थिक समस्यांचा सामना करावा लागला नाही.

# बाबर आझमला पोलिसांनी सुनावलं!

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

विश्वचषकाच्या स्पर्धेसाठी पाकिस्तानचा संघही सज्ज झाला आहे. बाबर आझमच्या नेतृत्वात बुधवारी भारतात येणार आहे. मात्र पाकिस्तान टीमचा कर्णधार बाबर आझमला वाहतूक पोलिसांनी आर्थिक दंड ठोठावला आहे. ऑडी चालवत असताना आठवड्यात दोनदा दंड मोडल्याने पाकिस्तानी क्रिकेटपटून बाबर आझमला पोलिसांनी खडे बोल सुनावले आहेत. लाहोर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. तसंच त्याच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना म्हणजेच लायसन्सही नव्हतं त्यामुळे पोलिसांनी त्याला चांगलंच झापलं आहे. बाबर आझमचा पोलिसांबरोबरचा फोटो व्हायरल झाला आहे. त्यामुळे त्याला ट्रोल केलं जातं आहे. पाकिस्तानच्या प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार पांढऱ्या रंगाच्या ऑडीतून बाबर आझम हायवेने जात होता. त्याने ओव्हरस्पिडिंग केलं तसंच वाहतुकीचे नियमही मोडले. लेनची शिस्तही त्याने पाळली नाही. पोलिसांनी त्याची गाडी अडवली आणि त्याच्याकडे लायसन्सची विचारणा केली. मात्र त्याच्याकडे लायसन्सही नसल्याचं समोर आलं. वाहतूक पोलिसांनी त्याला झापलं आणि त्याला आर्थिक दंडही भरावा लागला. पाकिस्तान क्रिकेट संघाच्या खेळाडूंना भारतीय व्हिसा देण्यात आला आहे. बाबर आझमविरोधात वाहतूक पोलिसांनी कारवाई करण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही त्याच्याविरोधात वाहतूक पोलिसांनी कारवाई केली होती. योग्य नंबर प्लेट नसल्याने यापूर्वी आझमच्या विरोधात कारवाई करण्यात आली होती. नंबर प्लेट ही निर्धारित नियमांप्रमाणे नसून हे कायद्याचं उल्लंघन आहे असं बाबरला यावेळेस पोलिसांनी सांगितलं होतं.